महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश-२०२२-२३/२०२२/२८०२ दिनांक : २४.०६.२०२२
24 JUN 2022

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासूनच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेबाबत..**

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले Approval Process Handbook 2022-23.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No. : AICTE/AB/WR/Lateral Entry/2022, दिनांक १२.०४.२०२२.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एडीएम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२२/४९३ दिनांक १५.०६.२०२२.

महाराष्ट्र राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका या अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत पार पाडली जाते. विविध पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता आवश्यक असणारी प्रवेश पात्रता ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली अशा संबंधित अभ्यासक्रमांच्या शिखर परिषदांद्वारे वेळोवेळी जाहिर केलेल्या मानकांनुसार निश्चित केली जाते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने प्रवेश नियमावली, प्रवेश पात्रता इ. घोषित केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेल्या संदर्भ क्रमांक १ मधील Approval Process Handbook 2022-23 नुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवारांची प्रवेश पात्रता निश्चित केलेली आहे.

परंतु, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे यांच्या अंतर्गत १० + २ Vocational (MCVC) अभ्यासक्रम राबविला जातो. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना Physics, Chemistry आणि Math हे विषय न शिकता व्यावसायिक विषय (Vocational Subjects) घेऊन इ.१२वीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमांक २ मधील पत्रानुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे.

त्यानुसार, राज्यातील HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी खालीलप्रमाणे सवलत दिलेली आहे. यास अनुसरुन थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता 10+2 उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता ग्राह्य धरण्यात येत आहे.

**Passed 10+2 examination with Physics / Mathematics / Chemistry / Computer Science / Electronics / Information Technology / Biology / Informatics Practices / Biotechnology / Technical Vocational Subject / Agriculture / Engineering Graphics / Business Studies / Entrepreneurship (Any of the three)**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापुढे AICTE Approval Process Handbook (APH) 2022-23 मध्ये नमुद केलेल्या अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यावेळी अधिसूचित केलेल्या प्रवेश पात्रतेनुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक व संदर्भ क्रमांक २ पत्र आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावरिल **Admission Section** मध्ये व प्रदर्शित करावे.

सोबत : संदर्भ क्रमांक २ मधील पत्र.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः

१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्रमांक १०)
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद्
(भारत सरकार का एक सांविधिक निकाय)
(मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार)
नेल्सन मंडेला मार्ग, वसंत कुंज, नई दिल्ली-110070

सत्यमेव जयते

ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION
(A Statutory Body of the Govt. of India)
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
Nelson Mandela Marg, Vasant Kunj, New Delhi-110070

Phone : 011-26131577 - 78, 80
011-29581000
Website : www.aicte-india.org

**F. NO. : AICTE/AB/WR/Lateral Entry/2022** **Date : 12-04-2022**

**To**

**The Director,**
Directorate of Technical Education,
Govt. of Maharashtra,
3, Mahapalika Marg, Post Box No. 1967,
Mumbai – 400001
(E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in)

**Sub : Clarification on minimum qualification clause for lateral entry to Diploma in Engineering notified in APH 2022-23 and request to consider the proposed change to remove anomaly.**

This has reference to your letter number 10/DTE/NGP/2022-23/321, dated 05-04-2022 on the above mentioned subject.

In this connection, it is informed that relaxation for 2 years (i.e. until A.Y. 2023-24) in the eligibility norms for Second Year Lateral Entry Diploma Courses shall be as per APH 2021-22 as follows :

| Programme | Duration | Eligibility |
|---|---|---|
| All Programmes (Lateral Entry to Second Year Diploma) | 2 years | Passed 10+2 examination with Physics/ Mathematics / Chemistry/ Computer Science/ Electronics/Information Technology/ Biology/ Informatics Practices/ Biotechnology/ Technical Vocational subject/ Agriculture/ Engineering Graphics/ Business Studies/Entrepreneurship (Any of the three)<br>**OR**<br>10th + (2 years ITI) with appropriate Trade in that order shall be eligible for admission to Second Year Diploma Course(s) of appropriate Programme.<br>(The Affiliating Body will offer suitable bridge courses such as Mathematics, Physics, Engineering drawing, etc., for the students coming from diverse backgrounds to achieve desired learning outcomes of the programme) |

This relaxation is being granted because students who are already pursuing the MCVC courses shall stand deprived. DTE Maharashtra is informed that as of academic year 2024-25 the current norms (or any subsequent amendments to it) shall prevail.

Therefore, DTE, Maharashtra may issue a Notice giving clarification for the same to be applied for admission to lateral entry Diploma courses in Engineering and Technology for next two years as per table above and subsequently (for A.Y. 2024-25 onwards) as per current APH 2022-23.

This has the approval of the Competent Authority.

12.4.22

**Member Secretary**
**(AICTE)**

**Copy to:-**

**The Regional Officer,**
AICTE, 2nd Floor, Industrial Research Centre Building,
National Institute of Industrial Engineering (NITIE) Campus,
Vihar Lake, Powai,
Mumbai – 400087 (MS)